


# चारा छावणी

* संकलन व शब्दांकन *

**राजू नंदकर**

उपजिल्हाधिकारी (कन्नड) औरंगाबाद

* मार्गदर्शन *

**विक्रम कुमार** (भा.प्र.से.)

जिल्हाधिकारी, औरंगाबाद

**डॉ. उमाकांत दांगट** (भा.प्र.से.)

विभागीय आयुक्त, औरंगाबाद

महाराष्ट्र शासन

महसुल व वन विभाग

जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

(फक्त कार्यालयीन वितरणाकरीता)



# * मनोगत *



**राजू नंदकर**
उपजिल्हाधिकारी (कन्नड - खुलताबाद)
Mob - 9970246417
Email - rsnandkar @ gmail.com

दुष्काळाचे दूष्ट चक्र भेदण्याचे अथक प्रयत्न शासन व प्रशासन यांचे मार्फत अहोरात्र चालू असतात. दुष्काळात पाणी टंचाई व अन्नधान्य टंचाई सोबतच चारा टंचाई सुद्धा निर्माण होते. अशा संघर्षमय परिस्थितीत जनावरांकडे दुर्लक्ष झाल्याने जनावरे एकतर बाजारात कवडीमोल भावाने विकली जातात किंवा कुपोषीत होवून मरणासन्न अवस्थेत जातात. त्यामुळे शासना मार्फत चालविली जाणारी चारा छावणी ही वरदान ठरते.

लगतच्या काळात पिक पद्धतीत अमुलाग्र बदल झाल्यामुळे दिवसागणीक सुका व ओला चारा टंचाई पशुपालकांना भेडसावत असते मात्र दुष्काळात ही टंचाई तीव्र स्वरुपात निर्माण होते. एकीकडे दुष्काळात पिके हातची गेलेली असतात, पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण झालेले असते अशा परिस्थितीत मुकी जनावरे कवडी मोल भावात शेतकरी विकायला सुरुवात करतो. यामुळे एकतर तो आपल्या शेतीस पूरक असलेला जोडधंदा कायमचा संपुष्टात आणतो किंवा शेतीच्या मशागती बाबत परावलंबी होतो.

शेतीचा हा पारंपारिक जोडधंदा अबाधित राहावा याबाबत शासन आपले उत्तर दायित्व समजून जिल्हा प्रशासनामार्फत जनावरांच्या चारा छावण्या विविध संस्था मार्फत उघडल्या जातात. चारा छावण्याचे व्यवस्थापन कशा प्रकारे करावे, महसूल प्रशासनाने त्यांचे पर्यवेक्षण कशा प्रकारे करावे, अभिलेखे कशा प्रकारे अद्ययावत ठेवावे याबाबत पुरेसे ज्ञान नसल्यामुळे अनियमितता निर्माण होवून मूळ हेतूच डावलला जातो व शासनाची प्रतिमा मलीन होते.

सन २०१२ - २०१३ च्या दुष्काळात चारा छावण्या उघडल्या नंतर आमचे तत्कालीन जिल्हाधिकारी मा. श्याम देशपांडे यांचे मार्गदर्शनाखाली विना तक्रार चारा छावणी नियोजन, व्यवस्थापन व पर्यवेक्षण पार पाडत असतांना आलेल्या अनुभवांचे हे संकलन असून सदर संकलन पुस्तिकेत शासन निर्णय व शासनाकडील विविध आदेशांचा संदर्भ घेण्यात आला आहे. ही संकलन पुस्तिका करणेस खरे प्रेरणा स्त्रोत मा. डॉ. उमाकांत दांगट (भा.प्र.से) विभागीय आयुक्त, औरंगाबाद व मा. विक्रम कुमार (भा.प्र.से) जिल्हाधिकारी, औरंगाबाद हे आहेत. सदर संकलन पुस्तिका तयार करणे कामी मा. जितेंद्र पापळकर उपायुक्त (महसूल) औरंगाबाद, आणी जालना व औरंगाबाद जिल्ह्यातील निवासी उपजिल्हाधिकारी अनुक्रमे श्री. वामण कदम व रविंद्र राजपूत तसेच महसूल परिवारातील सर्व कर्मचारी व अधिकारी यांचा सुद्धा मोलाचा वाटा आहे. माझे कार्यालयीन कर्मचार्‍यांनी ही पुस्तीका परिपूर्ण करण्यास मोलाचा हातभार लावला आहे हे नमूद करणे मी उचित समजतो. सदर पुस्तीका ही अल्पावधीत तयार केली असल्याने त्रुटी व विसंगती आढळल्यास शासन संदर्भ विचारात घेण्याची विनंती आहे. ही संकलन पुस्तिका महसूल अधिकारी व कर्मचारी, पशु वैद्यकीय अधिकारी व चारा छावणी संस्था चालक यांना निश्चितच उपयोगी पडेल याबाबत मला खात्री आहे.

# * प्रास्ताविक *

भारत हा शेतीप्रधान देश आहे. देशातील ७० टक्के लोक हे जोड धंदा म्हणून पशु पालनाचा व्यवसाय करतात. जनावरेही आपल्या शेती, संस्कृती आणि आरोग्याचा आधार आहेत. पशुपालनाने खऱ्या अर्थाने शेतकऱ्याला आर्थिक ताकद दिली. शेतातील उत्पन्न हे अनिश्चित स्वरुपाचे असल्याने हा व्यवसाय शेतकऱ्याच्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी पूरक म्हणून काम करतो. पशु पालन या जोड धंद्यात गाय, बैल व म्हशी पालन हे महत्वाचे अंग असून दुध उत्पादन व शेतीची मशागत या साठी मुख्यत्वे वापर केला जातो.

वारंवार पडणारे दुष्काळ व त्यामुळे निर्माण होणारी पाणी व चारा टंचाई यामुळे या शेतीपूरक व्यवसायास घरघर लागली आहे, त्यामुळे शेतकरी आपली जनावरे विकत असल्याने कृषी अर्थव्यवस्था खिळखिळी झाली आहे. दुष्काळात हातची पिके गेल्यामुळे पाणी टंचाई बरोबर चारा टंचाई अति तीव्र व उग्र स्वरुप धारण करते. अशा परिस्थितीत शासन व प्रशासन यांचा हस्तक्षेप अनिवार्य ठरतोव उद्भवलेल्या परिस्थितीवर मात करणेसाठी शासन अनुदानित जनावरांच्या चारा छावण्या उघडल्या जातात.

फार पूर्वीपासून दुष्काळ व टंचाई परिस्थितीत शासन पशुपालकांना मदत करत असे. १९७२ च्या भयावह दुष्काळात शासनाकडून शेतकऱ्यांना चारा तगाई, पैसे व चारा स्वरुपात वाटप करण्यात येत असे. असे पैसे व चारा यांचे प्रमाण बऱ्याच वेळा ५० : ५० टक्के राहत असे. त्यानंतर चारा डेपोमार्फतही चारा वाटपाचा कार्यक्रम राबवण्यात येत असे. अशा चारा डेपोमधून शेतकरी यांना ५० ते७५ टक्के अनुदानावर चारा वाटप करण्यात येत असे. मात्र लगतच्या काळात अशा चारा डेपोवर शासनास अनियमितता दिसून आल्यामुळे चारा डेपो उघडण्यास शासनाकडून परवानगी नसून त्या बदल्यात चारा छावणीला परवानगी देवून टंचाई व दुष्काळी परिस्थितीत चारा टंचाई सारख्या समस्येवर चारा छावणीच्या माध्यमातून मात करण्याचा प्रयत्न शासनाकडून केला जात आहे.



## ✲ चारा छावणी उघडणेसाठी संस्थेची निवड :–

चारा छावणी सुरु करणेसाठी धर्मदाय कायदा **(Indian Trust Act 1882)**, सोसायटी कायदा **(Societies Registration Act 1960)**, महाराष्ट सहकारी सोसायटी कायदा **(Maharashtra Cooperative Society Act 1960)** खाली नोंदणी झालेल्या सहकारी व सेवाभावी संस्था जनावरांच्या चारा छावण्या सुरु करु शकतात.

## ✲ चारा छावणी सुरु करणेसाठी मान्यताप्राप्त संस्था :–



१) विविध विकास कार्यकारी संस्था

२) सहकारी साखर कारखाने

३) सहकारी सुत गिरण्या

४) कृषी उत्पन्न बाजार समिती

५) सेवाभावी संस्था

६) सहकारी तालुका खरेदी विक्री संघ

७) सहकारी दुध उत्पादक संस्था

८) ग्रामपंचायत

## ✲ चारा छावणी सुरु करणेसाठी आवश्यक कागद पत्रे:–

१) संस्थेचा अर्ज.

२) संस्थेचा जाहीरनामा.

३) संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र.

४) मागील तीन वर्षाचे ताळेबंद.

५) संस्थेचा चारा छावणी उघडण्याबाबत संचालक मंडळाचा ठराव.

६) संस्थेचे संचालक व सभासद यादी.

७) संस्थेचे मागील तीन वर्षाचे आयकर परतावा फॉर्म.

८) संस्थेच्या कार्यकारणीचा छावणी चालू करणेसाठी ठराव.

९) बँक खातेपास बुक.

१०) ग्रामपंचायत ना हरकत प्रमाणपत्र.

११) जागेबाबत ची कागदपत्र.

१२) चारा उपलब्ध बाबतचे प्रमाणपत्र.

१३) पिण्यायोग्य पाणी उपलब्ध बाबतचे प्रमाणपत्र.

१४) वीज जोडणी उपलब्ध बाबतचे प्रमाणपत्र.

१५) जनावरे मालकाची यादी.

## ❋ अर्ज कोठे व कोणी करावा :-

चारा छावणी उघडू इच्छित असलेल्या संस्थेस कागद पत्रासह तहसीलदार यांचेकडे अर्ज करता येईल. सदर अर्ज सादर केल्यानंतर त्याची पोहोच पावती घ्यावी. अर्ज प्राप्त झालेनंतर तहसीलदार स्वत: नियोजित जागेस भेट देवून सदर जागा चारा छावणी साठी योग्य आहे का ? तसेच तेथे पाणी, वीज, याची उपलब्धता व सोय आहे का याची पाहणी करुन स्थळ पाहणी पंचनामा करतील.

## ❋ अर्ज प्राप्त झालेनंतरची कार्यवाही :-

अर्ज प्राप्त झालेनंतर तपासणी लिपीक यांनी तपासणी सुची प्रमाणे कागदपत्रे पूर्ण आहेत कि नाही याची खात्री करावी. काही कागदपत्रे अपूर्ण असल्यास तसे संबंधित संस्थेस कळवून त्यांचे मार्फत कागदपत्राची पुर्तता करुन घेतली जाते. परिपूर्ण असा प्रस्ताव ही मंजुरी साठी तयार केला जातो. अशी मंजुरी शासनाकडील प्राप्त आदेशानुसार परिस्थितीनुरुप जिल्हाधिकारी / उपविभागीय अधिकारी / तहसिलदार यांचे मार्फत दिली जाते.

## ❋ चारा छावणी साठी संस्था चालकाची आवश्यक पात्रता :-

१) संस्था नोंदणी हे कमीत कमी तीन वर्षा पूर्वीचे असावे.

२) संस्था पूर्वी पासून सामाजिक व लोक उपयोगी कार्यक्रमात सहभागी असावी.

३) संस्था या पूर्वी काळ्या यादीत समाविष्ट केलेली नसावी.

४) संस्थेकडे चारा छावणी सुरु करणेसाठी पुरेसे भांडवल असावे.

५) संस्था चालक किंवा संस्था यापूर्वी दिवाळखोर म्हणून घोषित केलेली नसावी.

## ❋ चारा छावणीत जनावरे दाखल करणे साठीचे कागदपत्र :-

१) अर्ज.

२) ७/१२ चा उतारा.

३) तलाठी यांचे ना हरकत प्रमाणपत्र.

४) प्रतिज्ञापत्र.

५) पशु वैद्यकीय अधिकारी यांचे जनावर स्वस्थ असल्याचे प्रमाणपत्र.

## * चारा छावणीचे अभिलेख व नोंदवह्या :–

चारा छावणीमध्ये अभिलेख विभागात खालील नोंदवह्या ठेवल्या जातात.

१) प्रपत्र अ : जनावरे आवक नोंदवही
२) प्रपत्र ब : चारा आवक नोंदवही
३) प्रपत्र क : चारा वितरणाची नोंदवही गोषवारा
४) प्रपत्र ड : चारा वितरण प्रत्यक्ष नोंदवही
५) प्रपत्र इ : जनावरे हालचाल नोंदवही
६) प्रपत्र फ : संस्थांना देण्यात येणाऱ्या धनराशी नोंदवही
७) प्रपत्र ग : रोख नोंदवही (कॅश बुक)
८) प्रपत्र ह : मोफत चारा/पशुखाद्य प्राप्त नोंदवही
९) प्रपत्र ई : जनावरे लसीकरण नोंदवही
१०) चारा कार्ड :
११) भेट पुस्तिका :

## * चारा छावणीचे बॅनर :–

चारा छावणी संस्थेने प्रवेश द्वाराचे दर्शनी भागावर फ्लेक्स बॅनर खालील प्रमाणे लावावे.

महाराष्ट्र शासन

**महसूल व वन विभाग अनुदानित**

.............................. सेवाभावी संस्था संचलित

जनावरांची चारा छावणी मौजे ..........................

फ्लेक्स बॅनर चा नमुना

## ❋ चारा छावणीचेदैनंदिन बोर्ड :–

संस्थेने चारा छावणीच्या ठिकाणी ठळक जागेवर खालील प्रमाणे फळा / बोर्ड लावावा व त्यावर दैनंदिन जनावरांची संख्या, चारा व पशुखाद्य साठा यांच्या नोंदी घ्याव्यात.

महाराष्ट्र शासन

### महसूल व वन विभाग अनुदानित

.............................. सेवाभावी संस्था संचलित

जनावरांची चारा छावणी मौजे ..........................

दिनांक : / /२०

| | |
|---|---|
| मोठी जनावरांची संख्या | |
| लहान जनावरांची संख्या | |
| एकुण जनावरांची संख्या | |
| ओला चारा साठा | मे. टन |
| सुका चारा साठा | मे. टन |
| पशुखाद्य साठा | क्विंटल |

## ❋ जनावरांना बिल्ले (टॅग) करणे:–



छावणीत जनावरांनी प्रवेश केल्यानंतर त्या जनावरांची नोंद विहित अशा नमुना नोंद वहीमध्ये करण्यात येते. त्यानंतर त्या जनावरास त्याचे वर्गीकरण (लहान व मोठे) आधारे एक चालत्या क्रमांकाचा बिल्ला दिला जातो. असे बिल्ले पितळ किंवा प्लॅस्टीक यापासून बनवले असतात. बिल्ले देत असतांना लहान जनावरांसाठी पिवळा रंगाचा बिल्ला व मोठे जनावरांसाठी लाल रंगाचा बिल्ला देण्यात येतो. असा बिल्ला आपण ज्या प्रमाणे जनावरांच्या गळ्यात घंटी बांधतो त्या प्रमाणे तो बांधावा. जनावरांची ओळख ही बिल्ला क्रमांकावरुन करण्यात यावी. दोन जनावरांना एकच क्रमांक मिळणार नाही याबाबत दक्ष रहावे.



### ✲ जनावरांची तपासणी व औषधी :–

पशुवैद्यकीय अधिकारी यांचे मार्फत विनामूल्य जनावरांची रोज तपासणी केली जाते. पशु वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र असल्याशिवाय जनावरास चारा छावणीस प्रवेश दिला जात नाही. तसेच पशु वैद्यकिय अधिकारी यांचेमार्फत रोज आवश्यकतेनुसार औषधी पुरवली जाते. आवश्यकते प्रमाणे लसीकरणही केले जाते.

### ✲ चारा छावणीची दैनंदिन तपासणी व अहवाल :–



जनावरांची संख्या/हजेरी घेण्याची जबाबदारी संबंधित तलाठी यांची असून त्या प्रमाणेत्यांनी रोज सकाळी चारा व पशुखाद्य वाटप झालेनंतर दहा वाजता व सायंकाळी पाच वाजता जनावरांची संख्या/हजेरी घेतली पाहिजे अशा हजेरीची नोंद घेतल्यानंतर त्यानेआपली स्वाक्षरी चारा वाटप नोंदवही व जनावरांची उपस्थिती नोंदवही यावर केलीपाहिजे. तसेच त्याने जनावरांची दैनंदिन हजेरी/संख्या तहसिलदार यांना तात्काळ विहित नमुन्यात कळवली पाहिजे.



### ✲ शेती कामासाठी जनावरे बाहेर घेवून जाणेबाबतची कार्यपद्धती :–

कोणत्याही पशु पालकास जनावरेशेती उपयोगी कामासाठी बाहेर घेवून जाण्याची मुभा राहील. मात्र अशी जनावरेएका दिवसासाठी बाहेर न्यावयाची असल्यास ती तलाठी यांनी जनावरांची हजेरी घेतल्या नंतर बाहेर घेवून जाता येतील व ती पुन्हा तलाठी यांनी छावणीत जनावरे मोजण्यापुर्वी ते जनावर छावणीत आणावे लागेल. जनावरे बाहेर शेती उपयोगी कामासाठी नेल्यास त्याची नोंद विहित नमुन्यात नोंदवही मध्ये घेता येईल. जनावरे एका दिवसापेक्षा जास्त दिवसासाठी बाहेर घेवून जायची असल्यास ती सकाळी १० पूर्वी बाहेर घेवून जाने आवश्यक राहील.

## * चारा छावणीची अचानक तपासणी व अहवाल :-



मंडळ अधिकारी यांनी आठ दिवसातून एकदा, नायब तहसिलदार यांनी पंधरा दिवसातून एकदा, तहसिलदार यांनी पंधरा दिवसातून एकदा व उपविभागीय अधिकारी यांनी पंधरा दिवसातून एकदा चारा छावणीची तपासणी केली पाहिजे. तपासणी करतांना जनावरांची संख्या व नोंदवह्या यांचा ताळमेळ घेवून या पुस्तकास जोडण्यात आलेला तपासणी फॉर्म भरला पाहिजे, तपासणी मध्ये काही अनियमितता व त्रुटी आढळून आल्यास त्या दूर करुन अनुपालन अहवाल सादर करणे संबंधित चारा छावणी चालकास लेखी कळवले पाहिजे. चारा छावणी चालक त्रुटी व अनियमितता दूर करणेस जाणीव पूर्वक टाळाटाळ करत असेल तर अशा चारा छावणी चालकास लेखी नोटीस देवून सदर चारा छावणी बंद करुन जनावरे व इतर चारा छावणीत हलवली पाहिजे. तपासणी मध्ये बऱ्याच वेळा जनावरांच्या संख्येत तफावत आढळून येते त्यामुळे जनावर संख्येबाबत तपासणी अधिकारी यांनी दक्ष राहणे गरजेचे आहे.



## * चारा छावणीची स्थान निश्चिती :-

चारा छावणी ही गावापासून शक्यतो २०० मीटर दूर असावी. चारा छावणीची जागा प्रशस्त व स्वच्छ असावी. सदर जागा ही एकसारखी व सपाट असावी. झाडे व झुडपे असल्यास ती काढून टाकावीत. जागा उंचावर असावी म्हणजे पाण्याचा निचरा योग्य प्रकारे होवू शकेल. जागा ही अति भुसभुशीत असू नये. उंदीर व घुशी यांचा प्रादुर्भाव झालेली जागा चारा छावणीसाठी निवडण्यात येवू नये. जागा कठीण व सपाट असेल तर शेण व मलमूत्र याचा निचरा जलद गतीनेहोतो.



## ❋ चारा छावणी कुंपण :-



चारा छावणीच्या चारही बाजुंनी लाकडाचे कुंपन करणे आवश्यक आहे. छावणीमध्ये येणेसाठी एकच प्रवेशद्वार असावे. कोणत्याही परिस्थितीत दोन प्रवेशद्वार ठेवण्याची परवानगी देवू नये.

## ❋ चारा साठविण्यासाठीचे पत्र्याचे शेड :-



चारा छावणीमध्ये जनावरांना जो चारा पुरवला जातो तो चारा उन व पाऊस यापासून संरक्षित ठेवला पाहिजे. त्यासाठी आवश्यकतेनूसार पत्र्याचे शेड उभारले पाहिजे. तसेच चारा छावणी कार्यालय तात्पुरते उभारले पाहिजे.

## ❋ चारा छावण्याची रचना :-

चारा छावणीची रचना हि पूर्व - पश्चिम असावी. चारा छावणीत जनावरे बांधणेसाठी आवश्यक ती व्यवस्था असावी.

जनावरासाठी चारा खाणेसाठी गव्हाण उपलब्ध करुन द्यावेत. मलमूत्र वाहून जाणेसाठी गटार सुद्धा उपलब्ध करुन द्यावेत. चारा छावणीमध्ये जनावरे बांधणेसाठी खालील दोन पद्धतीचा वापर चारा छावणी चालक करु शकतात.

### अ) शेपटीपुढे शेपटी पद्धत :-



या पद्धतीमध्ये जनावरांना धुण्यासाठी व दूध काढण्यासाठी दोन्ही ओळींमधील जागा अधिक उपयोगी पडते. जनावरांचे तोंड बाहेरच्या बाजूस असल्याने संसर्गजन्य रोग होण्याची शक्यता कमी असते, तसेच बाहेरच्या बाजूने ताजी हवा मिळते.

### ब) तोंडाकडे तोंड पद्धत :-



तोंडाकडे तोंड करुन बांधलेल्या जनावरांचे योग्य पद्धतीने निरीक्षण करता येते. गोठ्याच्या दोन्ही बाजूस मोकळी जागा असल्यामुळे सूर्यप्रकाश भरपूर मिळतो. जनावरांना चारा टाकणे सोपे जाते. रोगप्रसार कमी प्रमाणात होतो.

## ❋ जनावरांना चारा व पशुखाद्य वाटप

### अ) ओला चारा



जनावरांसाठी समतोल आहार आवश्यक असून त्याप्रमाणे ओला व सुका चारा आहारात आवश्यक त्या प्रमाणात पुरवणे आवश्यक आहे. जनावरांना ओला चारा म्हणून प्रामुख्याने उसाचे पाचट, रबी ज्वारी, मका दिला जातो मात्र असा चारा देत असतांनी तो कडबाकुटी द्वारे तुकडे करुन द्यावा जेणे करुन त्याची पोषकता वाढणेस मदत होते. ओला चारा हा उपलब्ध झालेनंतर दोन दिवसात जनावरांना उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संस्था चालकाची राहील, हिरवा चारा व गवत यात विरघळणाऱ्या साखरेचे प्रमाण अधिक असते त्यामुळे चाऱ्यात ओला चाऱ्याचे प्रमाण आवश्यक आहे.

### ब) सुका चारा



भारतासारख्या विकसनशील देशात वाळलेला चारा हेच जनावरांसाठी प्रमुख खाद्य असते. या चाऱ्यात सेल्युलोज व हेमीसेल्युलोजचे प्रमाण अधिक असल्यामुळे त्यात खनिज द्रव्ये, उर्जा, नायटोजनचे प्रमाण कमी असते. त्यामुळे वाळलेल्या चाऱ्यात पोषकद्रव्ये पूरक म्हणून टाकल्यास रोमंथिकेतील खाद्याच्या पचनक्षमतेत वाढ होऊन मिथेनचे उत्पादन कमी होते. ज्यामुळे जनावरांची वाढ चांगली होऊन दूध उत्पादनातही वाढ होते. सुका चारा जनावरांना देणेपुर्वी २ टक्के मिठाचे पाणी त्यावर शिंपून तो चारा जनावरांना द्यावा सुका चाऱ्यामध्ये मुख्यत्वे करुन मका, ज्वारी, गव्हाचे काड, ज्वारीचा कडबा, भाताचा पेंढा, मिश्र सुका चारा जनावरांच्या आहारात द्यावा.

### क) पशु खाद्य



चारा छावणी मधील मोठ्या जनावरांना एक किलोतसेच लहान जनावरांना अर्धा किलो पशुखाद्य अथवा पेंड दिवसाआड देण्यात यावी. पशु खाद्य वाटपाचे नोंदी चारा वाटप नोंदवहीमध्ये घेण्यात याव्यात. अधिकारी यांनी आपली चारा छावणी तपासणी करतांना याकडे कटाक्षाने लक्ष

पुरवावे. प्रथिनांचा स्रोत म्हणून सरकी पशुखाद्यात दोन टक्के खनिज मिश्रण, एक टक्का चुना पावडर आणि एक टक्का मिठाचा समावेश करावा. भुईमूग, जवस, तीळ, सूर्यफूल, खोबऱ्यापासून मिळणारी पेंड वापरण्यात यावी.

### ड) पाणी



जनावरांना ताजे व स्वच्छ पाणी सदैव उपलब्ध राहण्यासाठी पाण्याचे हौद व टाकी बांधावी. सदर टाकी ही जनावरांची संख्या विचारात घेवून सहा फूट बाय तीन फूट बाय दोन फूट (६ X ३ X २) अशा प्रकारेबांधता येवू शकेल. जनावरांना उन्हाळा असल्याने स्वच्छ पिण्याचे पाण्याची आवश्यकता असते. चारा छावणीतील जनावरांसाठी पिण्याचे पाणी पुरवणे महत्वाचे असल्याने चारा छावणीचे ठिकाण निवडतांना ते पाणी उपलब्ध असलेल्या जागे जवळच निवडावे. जनावरांना पाणी पिण्यासाठी छोटे हौद चारा छावणी परिसरात तयार करावेत.

### इ) खनिज मिश्रण



पशुधनामध्ये कॅल्शियम, सोडियम आणि मॅग्नेशियम आदी खनिजद्रव्यांची कमतरता असल्याने त्यांना चारा छावणीमध्ये प्रत्येक जनावरांच्या खुराकात दररोज अपेक्षित प्रमाणात क्षार मिश्रण देणे आवश्यक आहे. यासाठी चाऱ्याला युरिया प्रक्रिया व **Minerals Licking Block** याचा वापर करणे आवश्यक ठरते. युरिया, उसाची मळी, खनिज द्रव्ये यांच्या समावेशामुळे जनावरांद्वारे पोषक द्रव्यांच्या उपयोगीतेत वाढ होते. नियमितपणे खाद्यातून कॅल्शियमयुक्त क्षार मिश्रणे मोठ्या जनावरांना ५० ग्रॅम तर लहान जनावरांत २५ ग्रॅम प्रतिदिवस याप्रमाणे द्यावीत.

### ❋ कडबा कुटी



वाळलेल्या चाऱ्याचे तुकडे केल्यास किंवा भरडल्यास त्यात असलेल्या लिगनीन व सेल्युलोजसारख्या तंतूच्या कणांचा आकार कमी होतो. ज्यामुळे सेल्युलोजचे पचन चांगले होऊन मिथेनचे उत्पादन दहा टक्यांनी कमी होऊ शकते. तसेच चारा कुट्टी चा वापर केल्यामुळेचारा वाया जात नाही. त्यामुळेसंस्था चालकाकडे स्वयंचलीत किंवा पारंपारीक कडबा कुट्टी असावी.

### ❋ वजन मापे

चारा छावणीमध्ये जनावरांचे मालक यांना रोज चारा व पशुखाद्य हे वजन काट्यावर मोजून दिले जाते. यासाठी चारा छावणी चालक पारंपारीक वजन काटा व इलेक्टॉनीक्स वजन काट्यांचा वापर करु शकतात.







### ❋ शेड निवारा

चारा छावणीचे शेड हे कोणत्याही परिस्थितीत पत्र्याचे करु नये. उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे ग्रीन नेट किंवा गोणपाट पोते किंवा कडबा वापरुन शेड तयार करावे. ऊसाचे पाचट वापरुन सुद्धा सावली निर्माण करता येवू शकते.

### ❋ शेण

जनावरांच्या चारा छावणी पासून ५० मीटर अंतरावर खड्डा तयार करुन तेथे शेण साठवावे. चारा छावणीतील जनावरांपासून मिळणारे शेण घेवून जाणेस पशु मालकांना परवानगी नाही. नवीन शासन निर्णय नुसार सदर शेणाची मालकी हि चारा छावणी चालवणाऱ्या संस्थेस देण्यात आली आहे. मात्र पूर्वी यावर मालकी शासनाची असेव या शेणाचा लिलाव शासन करत असे.





### ❋ वीज

चारा छावणीमध्ये रात्री पुरेसा व आवश्यक असा प्रकाश आवश्यक असल्याने अधिकृत वीज जोडणी संस्था चालकाने अधिकृत वीज जोडणी उपलब्ध करुन घ्यावी. वीज कनेक्शन जोडणी ही उंचावरुन असावे तसेच उन्हाळ्याचे दिवस असल्याने जोडणी उघडी ठेवू नये.

## ❋ रस्ते

चारा छावणीची जागा हि शक्यतोरस्त्या लगत असावी. त्यामुळे प्राप्त होणारा चारा तात्काळ उतरवणेसाठी फायदा होईल.

## ❋ बंधपत्र

संस्था चालकाने चारा छावणीस सुरु केल्यानंतर विहित नमुन्यात बंधपत्र हे तहसिलदार यांना करुन दिले पाहिजे.

## ❋ जनावरांचे आरोग्य



उन्हाळ्यात हिरव्या वैरणीची टंचाई, पिण्याच्या पाण्याची टंचाई असे अनेक प्रश्न निर्माण होतात आणि मुकी जनावरेही या समस्येला सतत तोंड देत असतात. अशा परिस्थितीत जनावरांना अनेक आजार होण्याची शक्यता असते. उन्हाळ्यामध्ये हिरव्या चाऱ्याअभावी शेतकरी जनावरांना ऊसाचे वाढे खाऊ घालतात. ऊसाचे वाढे जास्त प्रमाणात खाल्यामुळे वाढ्यामधील ऑक्झेलेट खनिज व जनावरांच्या शरीरातील कॅल्शीअम एकत्र होऊन लघवीवाटे निघून जाते, त्यामुळे कॅल्शिअमची पातळी कमी होते. त्यामुळे जनावरांना "मिल्क फिवर" नावाचा रोग होते, त्यामुळे जनावरे थकून एकदम खाली बसतात. शरीराचे तापमान कमी होते, रवंथ बंद होते, जनावरे खात नाहीत, दूध देणे कमी होते, शरीर थंड पडते, जनावरे मान टाकून बसतात. यावर तातडीने पशुवैद्यकाकडून उपचार सुरु करावेत.

चारा छावणीत जनावरांची गर्दी असल्यामुळे व उन्हाळा हा कडक असल्यामुळे जनावरांना उष्माघात व इतर आजार होण्याचा संभव असतो. जनावरे उन्हात बांधू नयेत. पशुवैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत जनावरांची वेळोवेळी तपासणी करुन घ्यावी व तश्या नोंदी त्यांना नोंदवहीमध्ये घेण्यास सांगावे. जनावरांमध्ये उवा, माश्या, गोचीड या प्रकारातील बाह्य परोपजीवींची समस्या मोठ्या प्रमाणात आढळते. त्यामुळे चारा छावणीतील जनावरांना वेळेवर मिश्रण तयार करुन ते जनावरांच्या अंगावर कापडाने चोपडावे.

## ❋ छावणीतील जनावरांची संख्या :

एका छावणी मधील जनावरांच्या संख्येवर शासनाचे निर्बंध असून शासन निर्णयाप्रमाणे एका छावणीत कमीत कमी ५००

ते जास्तीत जास्त ३००० जनावरांना प्रवेश मिळू शकते. तसेच दोन चारा छावणींमधील अंतर हे ५ कि.मी. पेक्षा कमी असता कामा नये.

### ❋ नुकसान भरपाई :

पशु मालकाने एकदा जनावर चारा छावणीत जनावर दाखल झाल्यानंतर त्याचा नैसर्गिक किंवा अपघाताने मृत्यू झाल्यास त्यास संस्था चालकाकडून कोणताही मोबदला मिळत नाही. यासाठी जनावरे दाखल करत असतांनीच पशु पालकाकडून याबाबतचे बंध पत्र घ्यावे.

### ❋ चारा छावणीसाठी अनुदान

छावणी संस्था चालकास प्रति मोठे जनावर ७५ रुपये प्रति दिवस व लहान जनावर ३५ रुपये प्रति दिवस याप्रमाणे देय असते. सदर निधी मागणी संस्था चालकाने प्रत्येक आठवड्याच्या शेवटच्या दिवशी मा.जिल्हाधिकारी यांना सादर करणे आवश्यक आहे. छावणी सुरु करण्यासाठी जसे भांडवली खर्च जसे शेड, कुंपण, कडबा कुट्टी, वजन यंत्र, पाणी, वीज, पाण्याचा हौद इत्यादी खर्च हे संस्था चालकाने करणे अपेक्षित आहे. यासाठी शासनाकडून कोणतेही अनुदान प्राप्त होत नाही.

### ❋ मनुष्यबळ

चारा छावणी संस्थेने छावणीच्या योग्य व्यवस्थापनासाठी खालील कर्मचारी यांची नियुक्ती केली पाहिजे.

१) चारा छावणी व्यवस्थापक (एक) - छावणीचे व्यवस्थापन करणे.

२) लेखणीक (दोन) - दैनंदिन नोंदवह्या सांभाळणे व नोंदी घेणे.

३) चौकीदार (दोन) - सुरक्षा व्यवस्था ठेवणे.

४) कामगार (चार) - चारा व पशुखाद्य वाटप करणे.





## चारा छावणीमध्ये जनावरे दाखल करणेसाठी शेतकऱ्याचा अर्ज

प्रती,
मा. तहसिलदार साहेब,
------------------

विषय : महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग अनुदानित
---------------------------------------- संस्था
संचलित मौजे-------------- येथील चारा छावणी मध्ये जनावरे दाखल करुन घेणेबाबत.

अर्जदार : श्री. ------------------------------------- पत्ता
------------------------------------------
गट क्र. ------------------------------------- क्षेत्र
------------------------------------------

महोदय,

उपरोक्त विषयी विनंती पूर्वक कळवू इच्छितो की महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग अनुदानित ------------------------------------------------- संस्था संचलित चारा छावणी मध्ये माझी खालील नमूद जनावरे मी दाखल करीत आहे. सदर जनावरे मी -------- या कालावधीसाठी छावणीत ठेवू इच्छितो.

| अ.क्र. | जनावरे | संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| १. | लहान बैल | | |
| २. | लहान गायी | | |
| ३. | मोठे बैल | | |
| ४. | मोठे गायी | | |
| ५. | म्हशी | | |
| | एकूण | | |

उपरोक्त नमूद जनावरे मी माझ्या जबाबदारीवर चारा छावणीत दाखल करत आहे. शासनाने व संस्थेने नमूद केलेल्या करार पत्रकातील व खालील अटी मला मान्य आहेत.

१. जनावरांचा छावणीत मृत्यू झाल्यास कोणतीही भरपाई मिळणार नाही.
२. चारा छावणीत दाखल जनावरांची काळजी घेण्याची जबाबदारी माझी राहील.
३. जनावरांपासून मिळणारे शेणावर माझा कोणताही हक्क नाही.

आपला विश्वासू

शासनाचा प्रतिनिधी (तहसिलदार) व संस्था चालक यांचेकरार पत्रक

(१०० रुपयेच्या मुद्रांक पेपर वर)

प्रतिज्ञापत्र करुन घेणार श्री.------------- (तहसिलदार -------------) शासन प्रतिनिधी वय -----

पत्ता ----------

प्रतिज्ञापत्र करुन देणार ------------- (अध्यक्ष/सचिव) ------------------- संस्था ----------

मौजे-------- तालुका ----------- जिल्हा ---------- वय ------- पत्ता -------------

व्यवसाय ------------

ज्या अर्थी उद्‌भवलेली दुष्काळी परिस्थिती विचारात घेता जनावरांसाठी चारा छावणी उघडणेसाठी शासन आदेश प्राप्त आहेत. त्या अर्थी - ------------ संस्थेचा मौजे-------- ता. --------- येथे चारा छावणी उघडण्याचा परिपूर्ण प्रस्ताव छाणणी अंती पात्र ठरल्यानंतर ------------- या आदेशान्वयेचारा छावणी उघडण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्या अर्थी ------------------ हे------ ------ संस्थेचेअध्यक्ष/सचिव या नात्याने खालील अटी व शर्तीस अधिन राहुन प्रतिज्ञापत्र करुन देत आहे.

१) परवानगी आदेशात नमूद सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.
२) शासनाकडून अनुदानात बदल झाल्यास मला तोमान्य राहील.
३) आदेशात नमूद केलेल्या सर्व नोंदवह्या मी ठेवील व अद्यावत करील.
४) चारा छावणीतील खर्च जसे शेड, वीज, पाणी, वजन यंत्र, कडबा कुट्टी, कुंपन, मनुष्यबळ, इ. आमची संस्था करेल. यासाठी मी कोणतेही अनुदान मागणार नाही.
५) शासनाकडून मिळणारे अनुदान जोपर्यंत प्राप्त होत नाही तोपर्यंत मी माझे संस्थेच्या भांडवलामधून चारा छावणीचा खर्च करेल.
६) जनावरांची संख्या अचूक कळविण्याची जबाबदारी संस्थेची राहील. यामध्ये कोणतीही अनियमितता होणार नाही.
७) सर्व आर्थिक व्यवहार बँक खातेवरुनच करण्यात येईल.
८) संस्थेमार्फत अधिकृत वीज जोडणी घेतली जाईल.
९) खाण्यायोग्य चारा व पिण्यायोग्य स्वच्छ पाणी जनावरांना पुरविण्याची हमी संस्था चालकाची राहील.
१०) जनावरे दाखल करणाऱ्या व्यक्तीकडून कोणतेही शुल्क व रक्कम आकारली जाणार नाही.
११) तपासणी पथकास त्यांनी मागणी केलेले सर्व अभिलेखे व नोंदवह्या उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संस्थेची राहील.
१२) आग, चोरी या सारखी दुर्घटना घडल्यास कोणतीही भरपाई मागीतली जाणार नाही.
१३) चारा छावणी पूर्व कल्पना न देता अचानक बंद करता येणार नाही. असे केल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.
१४) चारा छावणीत कोणतीही अनियमितता व त्रुटी दिसून आल्यास छावणी बंद केल्यास त्याबाबत कोठेही दाद मागता येणार नाही.

साक्षीदार :

१) नांव -------------------- स्वाक्षरी

२) नांव -------------------- स्वाक्षरी

प्रतिज्ञापत्र करुन घेणार

नांव -------------------- स्वाक्षरी

प्रतिज्ञापत्र करुन देणार

नांव -------------------- स्वाक्षरी

स्थळ :

दिनांक :

# चारा कार्ड

१. जनावराच्या मालकाचे नांव ------------------------------------------------

------------------------- गाव ----------------

-----------------------

२. जमिनीचा गट क्र. -------------------- क्षेत्र --------------------

३. जनावरांचे विवरण ------------

| अ.क्र. | जनावरे | संख्या | प्रति दिन ओला चारा | प्रति दिन सुका चारा | प्रति दिन पशुखाद्य | ओळखीची खुण रंग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | लहान बैल | | | | | |
| २. | लहान गायी | | | | | |
| ३. | मोठे बैल | | | | | |
| ४. | मोठे गायी | | | | | |
| ५. | म्हशी | | | | | |
| | एकूण | | | | | |

<u>चारा व पशुखाद्य वाटप (कि.ग्रॅ. मध्ये)</u>

| दिनांक | ओला चारा | सुका चारा | पशुखाद्य | स्वाक्षरी | दिनांक | ओला चारा | सुका चारा | पशुखाद्य | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

## तलाठी यांनी तहसीलदार यांना दैनंदिन जनावरांची संख्या कळविण्याचा अहवाल

दिनांक : / /२०

प्रती,

मा. तहसिलदार साहेब

---------------------

विषय : महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग अनुदानित

-------------------------------------- संस्था

संचलित मौजे---------- येथील चारा छावणी मधील जनावरांची उपस्थिती कळवणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयी महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग अनुदानित --------------------------

-----------------------------------------------------------

संस्था संचलित मौजे---------------- छावणी मधील जनावरांची दिनांक : / /

रोजीची ............... वाजताची जनावरांची उपस्थिती खालील प्रमाणे असून ती प्रमाणित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | जनावरे | संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| १. | लहान जनावरे | | |
| २. | मोठी जनावरे | | |
| | एकूण | | |

उपरोक्त प्रमाणे अहवाल सादर.

तलाठी स्वाक्षरी

नांव ------------------------

सजा ----------------------

## तहसिलदार यांनी आठवडी निधी मागणी जिल्हाधिकारी यांना कळविण्याचा अहवाल.

दिनांक : / /२०

प्रती,
मा. जिल्हाधिकारी
----------------------

विषय : ----------------------------------------
---------------------------------------- आठवडी जनावरे उपस्थिती प्रमाणे अनुदान
मागणी कळवणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयी महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग अनुदानित ----------------------------
------------------------------------------------------------
संस्था संचलित मौजे---------------- छावणी मधील मागील आठवड्यातील जनावरांची
दिनांक : / / ते दिनांक : / / या कालावधीतील जनावरांच्या संख्येप्रमाणे अनुदान
मागणी खालील प्रमाणे कळविण्यात येत आहे.

| अ.क्र. | दिनांक | लहान जनावरे संख्या | अनुदान मागणी | मोठी जनावरे संख्या | अनुदान मागणी | एकुण अनुदान मागणी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | | | |
| २. | | | | | | | |
| ३. | | | | | | | |
| ४. | | | | | | | |
| ५. | | | | | | | |
| ६. | | | | | | | |
| ७. | | | | | | | |
| | एकुण | | | | | | |

उपरोक्त प्रमाणे अक्षरी -------------------- अनुदान मागणी नोंदवत आहोत कृपया उपलब्ध करुन देण्यात यावी ही

नम्र विनंती.

तहसिलदार

## महसूल अधिकारी यांचेसाठीचा चारा छावणी तपासणी फॉर्म

| अ.क्र. | तपासलेली बाब | विवरण / आढळून आलेली बाब / त्रुटी |
|---|---|---|
| १ | छावणी तपासणी दिनांक | |
| २ | छावणी चालवणारी संस्था | |
| ३ | संस्था र.जि.क्र. व वर्ष | |
| ४ | चारा छावणी ठिकाण | |
| ५ | समाविष्ट गावे | |
| ६ | चारा छावणी सुरु दिनांक | |
| ७ | छावणीतील तपासणी दिनांकास लहान जनावरे संख्या | |
| ८ | छावणीतील तपासणी दिनांकास मोठी जनावरे संख्या | |
| ९ | छावणीतील तपासणी दिनांकास एकूण जनावरे संख्या | |
| १० | तपासणी दिनांक पुर्वी मागील सात दिवसातील जनावरांच्या संख्येची सरासरी | |
| ११ | ओला चारा वाटप सुरु आहे का ? | |
| १२ | निकषा प्रमाणेवाटप होतो का ? | |
| १३ | सद्याचा स्टॉक किती टन आहे? | |
| १४ | सुका चारा वाटप सुरु आहे का ? | |
| १५ | निकषा प्रमाणेवाटप होतो का ? | |
| १६ | सद्याचा स्टॉक किती टन आहे? | |
| १७ | पशु खाद्य वाटप सुरु आहे का ? | |
| १८ | निकषा प्रमाणेवाटप होतो का ? | |
| १९ | सद्याचा स्टॉक किती टन आहे? | |
| २० | कुंपण घातले आहे का ? | |
| २१ | प्रवेश मार्ग किती आहेत ? | |
| २२ | पुरेसे पिण्यायोग्य पाणी पुरवलेले आहे का ? | |
| २३ | पुरेसी सावली आहेका ? | |
| २४ | रात्रीसाठी अधिकृत वीज कनेक्शन आहे का ? | |
| २५ | छावणी परिसर जागा सपाट आहे का ? | |
| २६ | उंदीर घूस प्रादुर्भाव आहे का ? | |
| २७ | चारा कुट्टी यंत्र आहे का ? | |
| २८ | वजन मापे आहे का ? | |
| २९ | जनावरांना चारा मोजून दिला जातो का ? | |
| ३० | प्रपत्र अ : जनावरे आवक नोंदवही बाबत अभिप्राय | |

## महसूल अधिकारी यांच साठीचा चारा छावणी तपासणी फॉर्म

| अ.क्र. | तपासलेली बाब | विवरण / आढळून आलेली बाब / त्रुटी |
|---|---|---|
| ३१ | प्रपत्र ब : चारा आवक नोंदवही बाबत अभिप्राय | |
| ३२ | प्रपत्र क : चारा आवक व वितरण नोंदवही गोषवारा बाबत अभिप्राय | |
| ३३ | प्रपत्र ड : चारा वितरण प्रत्यक्ष नोंदवही बाबत अभिप्राय | |
| ३४ | प्रपत्र इ : जनावरेहालचाल नोंदवही बाबत अभिप्राय | |
| ३५ | प्रपत्र फ : संस्थांना देण्यात येणाऱ्या धनराशी नोंदवही बाबत अभिप्राय | |
| ३६ | रोख नोंदवही (कॅश बुक) बाबत अभिप्राय | |
| ३७ | प्रपत्र ज : मोफत चारा पशुखाद्य प्राप्त नोंदवही बाबत अभिप्राय | |
| ३८ | प्रपत्र के : जनावरे लसीकरण नोंदवही बाबत अभिप्राय | |
| ३९ | चारा कार्ड वाटप केले आहे का ? | |
| ४० | जनावरांची नियमित तपासणी व लसीकरण होते का ? | |
| ४१ | प्रलंबित अनुदान रक्कम काय आहे? | |
| ४२ | जनावर मालकांच्या तक्रारी आहेत का ? | |
| ४३ | आढळून आलेल्या इतर बाबी ? | |
| ४४ | तपासणी अधिकाऱ्याचेनांव ? | |
| ४५ | हुद्दा | |
| ४६ | स्वाक्षरी | |
| ४७ | छावणी व्यवस्थापकाचे नांव | |
| ४८ | स्वाक्षरी | |

## चारा छावणी चालकाने ठेवायच्या विविध नोंदवह्या

### प्रपत्र अ : जनावरे आवक नोंदवही

| अ. क्र. | जनावर मालकाचे नांव | गांव | ८अ प्रमाणे क्षेत्र | दाखल केलेली लहान जनावरे | दाखल केलेली मोठी जनावरे | दाखल केलेली एकुण जनावरे | जनावरांना दिलेला बिल्ला क्रमांक | दाखल करुन घेणाऱ्याची स्वाक्षरी | दाखल करणाऱ्या मालकाची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

### प्रपत्र ब : चारा आवक नोंदवही

| अ.क्र. | दिनांक | चारा विक्रेताचे नांव | दाखल चारा | आज अखेर शिल्लक चारा (मेटन) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

### प्रपत्र क : चारा आवक व वितरण नोंदवही गोषवारा (मे. टन मध्ये)

| अ.क्र. | दिनांक | कालचा शिल्लक चारा | आजचा दाखल चारा | आजचा जनावरांना वितरीत चारा | आज अखेर शिल्लक चारा | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

## प्रपत्र ड : चारा वितरण प्रत्यक्ष नोंदवही (कि.ग्रॅ. मध्ये)

| अ. क्र. | जनावर मालकाचेनांव | कार्ड क्रमांक | दाखल केलेली लहाण जनावरे | दाखल केलेली मोठी जनावरे | दाखल केलेली एकुण जनावरे | वितरीत करण्यात आलेला चारा | वितरीत करण्यात आलेले पशुखाद्य | स्विकारणाऱ्याची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

## प्रपत्र इ : जनावरेहालचाल नोंदवही

| अ. क्र. | दिनांक | जनावर मालकाचे नांव | लाभार्थी कार्ड क्र. | दाखल केलेली एकुण जनावरे | शेती व इतर कामासाठी छावणीबाहेर नेलेली जनावरे | संबंधिताचे छावणीत शिल्लक जनावरे | बाहेर नेलेल्या जनावरांचे विवरण व बिल्ले क्रमांक | बाहेर घेवून जाणाऱ्या व्यक्तिची स्वाक्षरी | बाहेर नेलेली जनावरे परत छावणीत दाखल दिनांक | संख्या | छावणी व्यवस्था पकाची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

## प्रपत्र फ : संस्थांना देण्यात येणाऱ्या धनराशी माहिती

| अ.क्र. | तहसिल कार्यालयाकडून धनादेश प्राप्त दिनांक | धनादेश क्रमांक | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

## प्रपत्र ग : रोख नोंदवही (कॅश बुक)

| जमा बाजु | | | | खर्च बाजु | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | दिनांक | प्राप्त रक्कम विवरण | प्राप्त रक्कम | | दिनांक | खर्च रक्कम विवरण | खर्च रक्कम |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | प्रारंभी शिल्लक | |
| | | | | | | आजचा खर्च | |
| | | | | | | शेवटची शिल्लक | |
| | | | | | | | |

## प्रपत्र ह : मोफत चारा पशुखाद्य प्राप्त नोंदवही

| अ.क्र. | दिनांक | चारा दिलेल्या संस्थेचेनांव | पत्ता | मोफत पुरवलेला चारा | मोफत पुरवलेला पशुखाद्य | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

## प्रपत्र ई : जनावरेलसीकरण नोंदवही

| अ. क्र. | जनावर मालकाचे नाव | कार्ड क्रमांक | दाखल केलेली एकुण जनावरे | तपासलेल्या जनावरांची संख्या | लसीकरण केलेल्या जनावरांची संख्या | थोडक्यात विवरण | जनावर मालकाची स्वाक्षरी | तपासणी अधिकारी स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

## छावणीतील जनावरांसाठी खर्च मर्यादा (१ मे २०१३ पासून)

| अ.क्र. | जनावर | अनुदान मर्यादा (प्रति दिवस) | शेरा |
|---|---|---|---|
| १. | लहान जनावर | ३५ | सदर अनुदान मर्यादेत परिस्थीतीनुरुप शासन निर्णयाद्वारेबदल केलेजातात. |
| २. | मोठे जनावर | ७५ | |

## एका चारा छावणीतील जनावरे मर्यादा व क्षेत्र मर्यादा (२३ ऑगस्ट २०१२ पासून)

| अ.क्र. | जनावरेसंख्या | | शेरा |
|---|---|---|---|
| १. | किमान | ५०० | सदर संस्थेत परिस्थीतीनुरुप शासन निर्णयाद्वारेबदल केले जातात. |
| २. | कमाल | ३००० | |

## चारा छावणीतील जनावर द्यावयाचे चारा व पशुखाद्य याचे प्रमाण
## मा. आयुक्त पशु संवर्धन पुणे यांनी कळवल्या प्रमाणे(२३ जाने. २००३ पासून)

| अ.क्र. | जनावरेसंख्या | मोठे जनावर | लहाण जनावर | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | वाळलेलेगवत/कडबा | ६ कि.ग्रॅ. | ३ कि.ग्रॅ. | वाळलेली व ओली वैरण उपलब्ध असल्यास ५० टक्के याप्रमाणे. |
| २. | हिरवी वैरण/उस | १५ कि.ग्रॅ. | ७.५० कि.ग्रॅ. | |
| ३. | पशु खाद्य | १ कि.ग्रॅ. | ०.५० कि.ग्रॅ. | एक दिवसाआड देण्यात यावे. |
| ४. | खनिज मिश्रण | ५० ग्रॅ. | २५ ग्रॅ. | |

## प्रकल्प अहवाल
## (१००० जनावरे= ५०० मोठी + ५०० लहान
## कालावधी एक महिना करीता)

| अ.क्र. | बाब | विवरण | अंदाजीत खर्च |
|---|---|---|---|
| १. | जागा | संस्थेच्या मालकीची | ५००० |
| २. | वीज | | ५००० |
| ३. | पाणी | | १,००,००० |
| ४. | कुंपण | | ८००० |
| ५. | शेड/ग्रिन नेट | | १,००,००० |
| ६. | कडबा कुट्टी यंत्र | | १०,००० |
| ७. | वजन मापे | | ३००० |
| ८. | मनुष्यबळ | | ३०,००० |
| ९. | ओला चारा | १६१ मे. टन | ३,२२,००० |
| १०. | सुका चारा | ६७.५० मे. टन | २,३६,००० |
| ११. | पशुखाद्य | ११२.५० क्विंटल | २,०२,००० |
| १२. | खनिज मिश्रण | ११.२५ क्विंटल | ५०,००० |
| १३. | नोंदवह्या | | ४००० |
| | | एकुण खर्च | १०,७५,००० |

सदर प्रकल्प अहवाल हा उदाहरणा दाखल व अंदाजीत असून स्थानिक परिस्थितीनुसार त्यामध्ये बदल संभवतात.

वाचा : १) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. एससीवाय/१३२००३/प्र.क्र.३१/म - ११ दि. ८/१२/२००३

२) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. टिएजी/३४०३/प्र.क्र.१९/म - ११ दि. २४/१२/२००३

३) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. एससीवाय/०४/२०१०/प्र.क्र.४३/म - ११ दि. १९/४/२०१०

४) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. एससीवाय/०४/२०१०/प्र.क्र.४३/म - ११ दि. १९/४/२०१०

५) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. एससीवाय/२०११/प्र.क्र.२१९/म - ७ दि. २८/३/२०१२

६) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. एससीवाय/२०१२/प्र.क्र.१३१/म - ७ दि. २/५/२०१२

७) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. एससीवाय/२०१२/प्र.क्र.२८२/म - ०७ दि. २२/८/२०१२

८) शासन निर्णय क्र. एससीवाय/२०१२/प्र.क्र.२८२/म - ७ दि. २२/८/२०१२

९) शासन शुद्धीपत्रक क्र. एससीवाय/२०१२/प्र.क्र.२८२/म - ७ दि. २९/८/२०१२

१०) शासन निर्णय क्र. एससीवाय/२०१२/प्र.क्र.४२८/म - ७ दि. ९ जानेवारी २०१२

११) शासन निर्णय क्र. एससीवाय/२०१३/प्र.क्र.१/म - ७ दि. १५ जानेवारी २०१३

१२) --------------------------- संस्था यांचेपत्र क्र. .............. अन्वये..............
जनावरांची छावणी/२०१२-१३/२८७९ दिनांक / /

१३) तहसिलदार यांचा प्रस्ताव क्रमांक २० /चाछा/कावी-दि. / /

जा.क्र. /चारा छावणी/कावी -

कार्यालय उपविभागीय अधिकारी

दिनांक : / /

आदेश

ज्याअर्थी ------- जिल्ह्यातील --------- तालुक्यात सरासरी पेक्षा ५० टक्के पेक्षा कमी पर्जन्यमान झाले असल्यामुळे शासन निर्णय महसूल वन विभाग शासन निर्णय क्रमांक एससीवाय/२०१३/प्रक्र.१/म - ७ दि. १५ जानेवारी २०१३ सोबतच्या परिशिष्ट अ मध्ये -------- जिल्ह्यातील ५० पैशा पेक्षा कमी अंतीम पैसेवारी असलेली एकुण गांवे ------ दर्शविलेली आहेत. तसेच तहसिलदार ---------- यांचे कार्यालयाचे पत्र जा.क्र.२० ----/चा.टं/कावी दिनांक / /२० अन्वये-------------------- संस्था यांना ---------- जागेवर शासन अनुदानीत गुराची चारा छावणी सुरु करण्यास मंजुरी देण्या बाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. त्याअर्थी संदर्भ क्र. ९ वरील शासन निर्णयानुसार मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी ----------------- (उपविभागीय अधिकारी -------------) या आदेशान्वये------------ संस्था यांना मौजे------------ येथे खालील अटी व शर्तीस अधिन राहून जनावरांची छावणी सुरु करण्याची या आदेशान्वये परवानगी देण्यात येत आहे.

१) जनावरांच्या छावणीत लहान/मोठे किमान ५०० व अधिकतम ३००० पेक्षा अधिक जनावरांचा समावेश करता येणार नाही.

२) तहसिलदार यांच्या पत्राशिवाय शेतकऱ्यांच्या जनावरांच्या गुरांच्या छावणीत प्रवेश देता येणार नाही.

३) छावणीत प्रवेश दिलेल्या जनावरांचा अपघात किंवा नैसर्गिक/अनैसर्गिक मृत्यू झाल्यास त्या शेतकऱ्यास शासना मार्फत कोणतीही नुकसान भरपाई मिळणार नाही. यासाठी संबंधित शेतकऱ्यांकडून बंधपत्र करुन घेणेची जबाबदारी छावणी चालकाची राहील.

४) छावणी चालविणाऱ्या संस्थेने दररोज सकाळी १०:०० वा. छावणीतील जनावरांची संख्या तहसिलदार यांना कळविली पाहीजे.

शेतकऱ्यास शेतीच्या कामासाठी जनावरे घेवून जाणे असल्यास सकाळी १० नंतर घेवून जाणेस परवानगी घ्यावी.

५) छावणी चालविणाऱ्या संस्थेने आजारी जनावरांसाठी पशुवैद्यकीय सेवा स्वखर्चाने करावी लागेल.

६) छावणी चालविणाऱ्या संस्थेस जनावरांसाठी प्रतिदिन प्रति मोठे जनावर रु. ७५/– व प्रतिदिन प्रति लहान जनावरांसाठी ३५/– इतके अनुदान अनुज्ञेय राहील. सदरील अनुदान शासनाकडून ज्यावेळी उपलब्ध होईल त्यावेळी वितरण करण्यात येईल. अनुदान उपलब्ध होईपर्यंत छावणी चालकाने जनावरांच्या चाऱ्याचा व इतर बाबींचा खर्च स्वतः भागवावा लागेल. शासनाने यात काही बदल केल्यास तो बंधनकारक राहील.

७) छावणी चालविणाऱ्या संस्थेने टंचाई कालावधी किंवा गुरांची छावणी चालू असेपर्यंत यापैकी जो कालावधी कमी आहे त्या कालावधीसाठी अनुदान अनुज्ञेय राहील.

८) छावणी चालविणाऱ्या संस्थेने प्रतिदिन प्रति मोठ्या जनावरास ०६ किलोग्रॅम वाळलेली वैरण किंवा १५ किलोग्रॅम ओला चारा आणि ०१ किलोग्रॅम पशुखाद्य (एक दिवसआड) तसेच दररोज किमान ६० लिटर पाणी देणे आवश्यक आहे. तसेच प्रति लहान जनावरास प्रतिदिन ०३ किलोग्रॅम वाळलेली वैरण किंवा ७.५ किलोग्रॅम ओला चारा आणि अर्धा किलोग्रॅम पशुखाद्य (एक दिवसआड) किमान ३० लिटर पाणी देणेआवश्यक आहे. चाऱ्यांची प्रत जनावरास खाण्यायोग्य असावी. जर पशुसंवर्धन विभागाने चारा तपासणी अंतीम चारा जनावरास खाण्यास अयोग्य असेल अशी शिफारस केल्यानुसार छावणी चालक संस्थेवर दंडणीय कार्यवाही करण्यात येईल.

१०) दैनंदिन चारा आवक नोंदवही प्रपत्र ब मध्ये ठेवावी. त्यामध्ये दैनंदिन नोंदी घ्याव्यात.

११) दैनंदिन आवक होणारा मोफत चारा याची नोंद प्रपत्र ह मध्येठेवावी व त्यामुळेदैनंदिन नोंदी घ्याव्यात.

१२) चाऱ्याच्या वितरणाची नोंदवही (प्रत्येक एक दिवसाची नोंद) प्रपत्र ड मध्ये ठेवावी. त्यामध्ये दैनंदिन नोंदी घ्याव्यात.

१३) जनावरे आवक नोंदवही प्रपत्र अ मध्ये ठेवावे.

१४) दैनंदिन चारा वितरण नोंदवही प्रपत्र क मध्ये ठेवावे.

१५) जनावरे तपासणी व लसीकरण नोंदवही प्रपत्र ई मध्ये ठेवावे.

१६) छावणीत दाखल होणाऱ्या जनावरांसाठी प्रत्येक लाभार्थ्यांस लाभार्थी कार्ड वितरण करावेव दैनंदिन चारा वाटप नोंदी त्यामध्ये घेण्यात याव्यात.

१७) गुरांच्या छावण्यात ठेवण्यात आलेली गुरे व संस्थांना देण्यात आलेल्या धनराशी बाबतची माहिती प्रपत्र फ मध्ये तहसिलदार यांना घेवून उपविभागीय अधिकारी ---------- यांना सादर करावी.

१८) गुरांच्या छावणीत जनावरांना प्रवेश देतांना छावणी चालविणाऱ्या संस्थेन विहित कार्यवाही अनुसरणे अनिवार्य आहे.

१९) छावणी चालविणाऱ्या संस्थेनेजनावरांची हालचाल नोंदवही प्रपत्र इ मध्येठेवावेव त्यात दैनंदिन नोंदी घ्याव्यात.

२०) छावणी चालविणाऱ्या संस्थेनेदैनंदिन आर्थिक व्यवहाराचेकॅशबुक प्रपत्र ग मध्येठेवावेव त्यामध्येदैनंदिन नोंदी घ्याव्यात.

२१) चारा छावणीस भेट देणाऱ्या महसुल अधिकाऱ्यास किंवा मा. जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास भेट पुस्तिका नोंदी घेण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी.

२२) तसेच वेळोवेळी भेट देणाऱ्या महसुल अधिकाऱ्यास किंवा मा. जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास रेकॉर्ड तपासणी कामी उपलब्ध करुन देण्यात यावी. जनावरांच्या अवास्तव नोंदी आढळून आल्यास छावणी चालू झाल्याच्या दिनांका पासून दंडनीय कार्यवाही करण्यात येईल. तसेच छावणी बंद करण्याचेआदेश दिलेजातील.

२३) छावणी चालविणाऱ्या संस्थेनेछावणीची आखणी सोबत जोडलेल्या नकाशाप्रमाणेशेडमध्येकरावे. (सोबत नकाशा जोडला आहे)

२४) संस्थेनेस्वखर्चनिमोठ्या जनावरांसाठी पिवळ्या रंगाचा बिल्ला व त्यावर जनावरांचा क्रमांक तसेच लहान जनावरांसाठी लाल रंगाचा बिल्ला व त्यावर जनावरांचा नोंदणी क्रमांक दर्शविण्यात यावा. शेडची जागा १५० जनावरांची पुरेशी असेल असेएका पेक्षा अधिक आवश्यकतेनुसार शेड उभारावेलागतील. पहिल्या शेडमध्ये१ ते१५० जनावरेअसतील तर दुसऱ्या शेडमध्ये१५१ ते२५० प्रमाणेजनावरेठेवावी लागतील. शेड मधील जनावरांचेऊन व पावसा पासून संरक्षण व्हावेअशा प्रकारचेनिवारा शेड असणेआवश्यक आहे. यासाठी येणारा खर्च आपणांस अनुज्ञेय असणाऱ्या रु. ७५/–व रु. ३५/–मधुन भागवावा लागेल.

२५) छावणी चालविणाऱ्या संस्थेनेछावणीसाठी लागणारा भांडवली खर्च जसेकडबाकुट्टी, पिण्याच्या पाण्याचा हौद बांधणेलाकडी बॅरेकेटींग व सावलीसाठी शेड इत्यादी खर्च त्यांनी स्वतःच्या भांडवलातून भागवावा लागेल. यासाठी शासकीय रक्कम अनुज्ञेय असणार नाही.

२६) छावणी चालविणाऱ्या संस्थेनेचारा खरेदी करतांना चारा उत्पादक शेतकरी/व्यापारी यांचेकडून खरेदी केलेल्या चाऱ्यांची रक्कम रेखांकीत धनादेशाद्वारेवितरण करावी.

२७) छावणी चालविणाऱ्या संस्थेनेत्यांना वितरीत केलेल्या शासकीय अनुदानाचा हिशोब कायमस्वरुपी सुस्थितीत ठेवणेआवश्यक असून उपविभागीय अधिकारी, --------- मागणी करतील त्यावेळी हिशोबाचेकागदपत्र उपविभागीय अधिकारी ----- ------ यांचेकडे सादर करावी लागतील.

२८) छावणीतील जनावरांच्या शेणाची विल्हेवाट लावण्याचेस्वतंत्र तसेच जबाबदारी छावणी चालक संस्थेची/छावणी चालविणाऱ्या व्यक्तीची राहील व त्यापोटी त्यांना देय असलेल्या रकमेतुन कोणतीही वजाती करण्यात येऊ नये.

२९) छावणीतील जनावरांच्या खाद्यात पेंड आठवड्यातुन किमान तीन दिवस (एक दिवसाआड) आयुक्त, पशुसंवर्धन पुणेयांनी निश्चित केलेल्या प्रमाणात देण्यात यावी.

३०) छावणीची अंतिम देयके अदा करण्यापुर्वी ५% रक्कम राखुन ठेवण्यात यावी व तपासणी अंती रक्कम अदा करण्यात यावी.

३१) उपरोक्त वाचा मधील व विषयांकीत सर्व शासन निर्णयामध्ये नमुद केलेल्या अटी व शर्ती लागू राहतील.

३२) चारा छावणीमध्य जनावरे असेपर्यंत चारा छावणी चालू ठेवणे बंधनकारक राहील. याबाबत संस्था चालकांनी छावणी सुरु करण्यापुर्वी तसे बंधपत्रात नमुद करावे. चारा छावणी बंद करणेबाबत उपविभागीय अधिकारी -------------- यांचा निर्णय अंतिम राहील.

३३) चारा छावणीमध्ये सर्व गरजू शेतकरी खातेदारांची अटी व नियमांचे अधिन राहून जनावरे दाखल करुन घेणेची जबाबदारी संस्थेची राहील. परंतु मर्यादीत संख्येच्या म्हणजे३००० च्या वर जनावर दाखल करता येणार नाही.

३४) प्रत्येक दिवसाचा जनावरांचा दैनंदिन तक्ता व प्रत्येक जनावरास दैनंदिन चारा व आहाराच्या परिमाणाचा तक्ता छावणीचे दर्शनी भागात लावण्यात यावा.

३५) छावणीचे दैनिक व्हिडीओ चित्रीकरण करण्याची जबाबदारी छावणी चालकाची राहील.

३६) चारा वाटपाचे वेळी व्हिडीओ चित्रीकरण करण्यात यावे.

३७) चारा छावणीत रितसर विद्युत जोडणी घेऊन विद्युत पुरवठा करावा. रात्री आवश्यक इतका प्रकाश असावा.

३८) जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याचा स्रोत शक्यतोस्थानिक असावा. छावणी चालविणाऱ्या संस्थेने जनावरास आवश्यक तेवढे पिण्या योग्य पाणी उपलब्ध करुन देण्याचे हमीपत्र द्यावे लागेल.

३९) चारा छावणीची जागा चार चाकी वाहन पोहचेल अशा रोडलगत असावी.

४०) सदर छावणीवरील उपस्थित जनावरांची वस्तुनिष्ठ संख्या अहवाल पाठविण्याकामी दिवसातुन एक वेळा तलाठी यांनी छावणी तपासावी व दैनंदिन अहवाल तहसिलदार यांचेकडे सादर करावा.

४१) मंडळ अधिकारी यांनी दर मंगळवारी व शुक्रवारी छावणीची तपासणी करुन अहवाल सादर करावा.

४२) नायब तहसिलदार यांनी दर बुधवारी व शनिवारी छावणीची तपासणी करुन अहवाल सादर करावा.

४३) तहसिलदार यांनी आठवड्यातुन एकदा छावणीची तपासणी करुन अहवाल सादर करावा.

४४) उपविभागीय अधिकारी हे पंधरा दिवसातुन एकदा छावणी तपासुन वरिष्ठांना अहवाल सादर करतील.

४५) छावणी चालविणाऱ्या संस्थेने प्रशासनाने घातलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रु. १००/- मुद्रांक पेपरवर बंधपत्र तहसिलदार यांना साद र करणेबंधनकारक आहे.

४६) जनावरांची छावणी कोणतेही कारण न दाखवता बंद करण्याचे अधिकार उपविभागीय अधिकारी -------------यांनी राखुन ठेवले आहेत. या बाबतीत छावणी चालकास कोणत्याही न्यायालयात दाद मागता येणार नाही.

४७) छावणी चालविणाऱ्या संस्थेस कोणत्याही उपस्थित बाबीबद्दल न्यायालयात दाद मागता येणार नाही.

४८) उपरोक्त अटी व शर्ती पैकी काही अटी व शर्ती रद्द अथवा शिथील करण्याचा किंवा नवीन अटी शर्ती लागु करण्याचा संपुर्ण अधिकार मा. जिल्हाधिकारी, ----------- /उपविभागीय अधिकारी -------- यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

उपविभागीय अधिकारी

प्रतिलिपी :


१) मा. जिल्हाधिकारी -------------- यांना माहितीस्तव सादर.


२) तहसिलदार ---------- यांना देऊन कळविण्यात येतेकी, मंजुरी देण्यात आलेल्या गुरांचे छावणीचे ठिकाणी क्षेत्रीय कर्मचारी यांची नियुक्ती करुन छावणी मध्ये दाखल होणाऱ्या लहान व मोठ्या जनावरांचा अहवाल दररोज मला ई मेल द्वारेया कार्यालयास सादर करावा. तसेच आपण वेळोवेळी छावणीस भेट देऊन परवानगी दिलेल्या अटी व शर्ती प्रमाणेछावणी सुरु आहे किंवा कसे या बाबत तपासणी करुन आपला अहवाल दर सोमवारी कार्यालयास सादर करावा. तसेच शासन निर्णय क्रमांक एससीवाय/ २०१३/प्र.क्र.१/म-७ दिनांक १५ जानेवारी २०१३ मध्ये नमुद करण्यात आलेल्या बाबी नुसार पशुखाद्या विषयी खात्री करावी.

३) पशुवैद्यकीय अधिकारी ---------- यांना देऊन कळविण्यात येतेकी, आपण छावणीचे ठिकाणी दररोज भेट देऊन जनावरांची नियमित तपासणी करुन अहवाल या कार्यालयात दररोज ई मेल द्वारेन चुकता सादर करावा.

४) ---------------------------- संस्था मौजे---------------- यांना देऊन कळविण्यात येते की, आदेशात दिलेल्या अटी व शर्ती प्रमाणेतात्काळ छावणी सुरु करुन अहवाल सादर करावा.

उपविभागीय अधिकारी






राजू नंदकर
(एम.एस्सी. ॲग्री)
उपविभागीय अधिकारी, कन्नड, जिल्हा औरंगाबाद.
मो. ९९७०२४६४१७
ई-मेल : rsnandkar@gmail.com



मुद्रक : संजय प्रिंटींग प्रेस, कन्नड-औरंगाबाद.
प्रोप्रा.:पंकज शेजवळ / संदिप वाघुल